**महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई चालक भरती सन - २०१९**

**पोलीस अधीक्षक, वर्धा**

**जाहिरात क्रमांक कक्ष-६/पो.शि/पो.भरती/२०१९-** **ठिकाण :- वर्धा,** **दिनांक - / /२०१९**

महाराष्ट्र सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ मधील तरतुंदीनुसार पोलीस अधीक्षक, वर्धा यांच्या आस्थापनेवर सन २०१९ मध्ये पोलीस शिपाई चालक संवर्गात रिक्त होणारी ३७ पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई चालक पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

| | अ.जा. | अ.ज. | विज-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | इडब्ल्युएस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | ०२ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०४ | ०२ | ०२ | ०५ | २२ |
| महिला | ०२ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०२ | ०२ | ०१ | ०२ | १० |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०० |
| प्रकल्पग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०० |
| भुकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०० |
| माजी सैनिक | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०५ |
| अंशकालीन पदवीधर | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०० |
| पोलीस पाल्य | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०० |
| गृहरक्षकदल | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०० |
| अनाथ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०० |
| **एकुण** | ०५ | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०७ | ०५ | ०४ | ०८ | ३७ |

अ) उपरोक्त पदे ही दिनांक ३१-१२-२०१९ अखेरपर्यन्त रिक्त होणा-या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यांत आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणंतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चीत करण्यात आलेली आहेत.

ब) अंतिम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणा-या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवार जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवारांची निवड तात्पूरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवारांच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

क) पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा. सर्वेच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२००७ बाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहीत याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर सलंग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यामुळे दर्शविलेली पदे व आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्यसाचा अधिकार आहे. त्या बाबत उमेदवाराचा कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

www.nmk.co.in

Scanned by CamScanner

ड) शासनाने लागु केलेले खुल्याप्रवर्गातील आर्थीक दुर्बल घटकांसाठी लागु केलेले आरक्षण हे या अनुषंगाने उदभवणा-या न्यायालयीन प्रकरणातील अंतीम निर्णयाच्या अधिन असेल.

२) महाराष्ट्र सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम-२०११ www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर (Home Page) वर व या घटकाचे संकेतस्थळ sp.wardha@mahapolice.gov.in / wardhapolice.com.in वर उपलब्ध असून ते पोलीस शिपाई चालक पदावरील भरतीसाठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना लागु राहतील.

**महत्वाची टीप :-**

१. पोलीस शिपाई चालक भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास सबंधीत उमेदवाराने त्या बाबतची माहिती ॲन्टीकरप्शन ब्युरा, वर्धा यांना दुरध्वनी क्रमांक ०७१५२-२४३८४४ वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच या संदर्भात उमेदवार पोलीस अधिक्षक वर्धा या कार्यालयातील वरिष्ट अधिका-यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समीती-२०१९ तथा अपर पोलीस अधीक्षक,वर्धा/पोलीस उप अधीक्षक,वर्धा यांच्याशी संपर्क साधुन तक्रार करु शकतील. तसेच अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात ०२२-२२८५५६१४ या दुरध्वनी क्रमांकावरही तक्रार करता येईल.

२. उमेदवारांनी काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | कार्यालय अधीक्षक, पोलीस अधीक्षक, कार्यालय वर्धा | ०७१५२/२५५८३८ |
| २ | पोलीस नियंत्रणकक्ष, वर्धा | ०७१५२/२३२५०० |

१७/१०/१९

( डॉ. बसवराज तेली )
पोलीस अधीक्षक, वर्धा.

www.nmk.co.in

Scanned by CamScanner